# ५. जिल्हा परिषद सेस फंड योजना

**योजनेचा उद्देश** :--**जिल्हयातील** सर्व शेतक-यांना शेती विषयक औजारे अनुदानावर उपलब्ध करुन शेतीत यात्रिंकीकरण वाढवणे व अनुषंगिक नाविण्यपुर्ण बाबींच्या योजना राबविणे .

**स्वरुप**--

( रुपये लाखात )

| अ.न | योजना | मंजुर तरतुद | देय अनुदान |
|---|---|---|---|
| १ | कृषि दिन साजरा करणे. | ०.८५ | प्रति पं.स.रु.५०००/- व जि.प.स्तर रु.१००००/ |
| २ | शेतक-यांना स्वयंचलीत पिक संरक्षण अवजारे ५० टक्के मर्या. रु.२०००/-अनुदानावर पुरविणे. | ५.०० | ५० टक्के मर्या.रुपये २०००/- |
| ३ | शेतक-यांना ५० टक्के मर्या.रु.४००/-अनुदानावर एच.डी.पी.ई.पाईप पुरविणे. | १२.०० | ५० टक्के मर्या.रुपये ४००/- |
| ४ | शेतक-यांना  ५० टक्के मर्या. अनुदानावर इले.पंप संच/सबमर्सिबल पंपसंच पुरविणे. | १४.०० | ३ एचपी ५० टक्के मर्या.रुपये ८०००/-<br>५ एचपी ५० टक्के मर्या.रुपये १००००/- ७.५ एचपी ५० टक्के मर्या.रुपये १२०००/-<br>१० एच.पी. ५० टक्के मर्या.रुपये १४०००/-<br>१२.५ एच.पी. ५० टक्के मर्या.रुपये १६०००/- |
| ५ | शेतक-यांना ५० टक्के मर्या. ३००००/-अनुदानावर सुधा.कृषि औजारे (पल्टीनांगर) पुरविणे. | २५.०० | ५० टक्के मर्या.रुपये ३००००/- |
| ६ | शेतक-यांना ५० टक्के मर्या.४००००/-अनुदानावर सुधा.कृषि औजारे (रोटाव्हेटर) पुरविणे. | ३४.०० | ५० टक्के मर्या.रुपये ४००००/- |
| ७ | वकिल फी | ०.१० | -- |
| ८ | कार्यालयीन खर्च | ५.०० | -- |
| ९ | आदर्श शेतकरी पुरस्कार | ३.०० | प्रत्येक तालुक्यातुन एका शेतक-यास पुरस्कार देवुन सन्मान करणे. |
| १० | अल्पोपहार | ०.१५ | |
| | | ९९.१०० | --- |

**टिप** :-**१. वरिल देय अनुदान हे जी.एस.टी. वजा जाता मुळ किंमतीच्या ५० टक्क्े मर्या.अनुदान देय आहे.**

**२. सदरची योजना ही डी.बी.टी.दवारे राबविण्यात येते.**

**३. टॅक्टरचलित औजारेंपैकि कोणत्याही एकाच औजारेंवर अनुदान देय राहील.**

**लाभार्थी निवडीचे निकष** :--**अल्प**/ अत्यल्प/ अनु.जाती/अनु.जमाती/ महिला व इतर जमीन धारक शेतकरी पात्र राहतील.

**योजनेचा लाभ घेण्यासाठी लागणारी आवश्यक कागदपत्र :--**

१शेतक-यांचा मागणी अर्ज,

२) चालु वर्षाचा खाते उतारा,व ७/१२ उतारा. (एच.डी.पी.ई.पाईप साठी ७/१२ उता-यावर विहिर व इले.मोटर नोंद, पल्टीनांगर व रोटाव्हेटरसाठी ट्रक्टर असलेबाबत आर.सी.बुक साक्षांकित प्रत व विद्युत पंपसंचासाठी पाण्याचा स्त्रोत व विद्युत जोडणी असणे आवश्यक आहे.)

३) आधारकार्ड

४) आधारलिंक बॅंक खाते .

५) १ मे २००१ नंतर तिसरे अपत्य नसल्याचा ग्रामसेवक दाखला